

# मी लिहिलेले थोडे कांही

पिनाकपाणि ( अशोक बसर्गेकर)

## वाट पाहे साधना

हरवला असा कसा
परवाना सांग ना,
परतुनि तूं येशिल कधि
वाट पाहे साधना ॥ १ ॥

लंडनचा ऋतु हिरवा
बॉनमधिल धुंद हवा
पॅरिसचा रंग नवा
सोड आतां धाव ना ॥ २ ॥

बिकिनीतिल पोरींचा
गौर वर्ण युवतींचा
छंद तुझा बघण्याचा
आवर तव लोचना ॥ ३ ॥

वस्तुनिष्ठ अमेरिका
आवडली तुज जर का
विरहाचा तर धोका
मज लागे वंचना ॥ ४ ॥

रचना पिनाकपाणि

## त्या तिथे पलिकडे

त्या तिथे पलिकडे तिकडे
माझिया प्रियेचे झोपडे ॥ धृ ॥

चिखल राड करिती पाय
जितीचा ओढा भरुनि जाय
वळणावर रांकेने
पोर बसे नागडे ॥ १ ॥

दारावर यष्टी स्टॅण्ड
यात्रेकरुना रुचेल
पावसाचि सर येतां
आसऱ्यास सापडे ॥ २ ॥

तिथेच रिक्षा थांबल्या
टांग्यासवे धावल्या
स्टॅण्ड निघुनि जाय जो
सर्व पडे थोकडे ॥ ३ ॥

रचना पिनाकपाणि

## इन्द्राणी

मऊ रेशिमी सॅटिन बिकिनी,
रंग बिरंगी नेसोनी
दौडत खिदळत, लाटा उधळत,
येई राणी इन्द्राणी
सागरतीरी रेतीवरुनी
मुरकत जाई अनवाणी
कमरेभंवती विळखा देउनि
चाले बिलगत मनमानी
अल्लड चंचल केस कपाळी
भुरभुरती तें वाऱ्यानी
चोळिचड्डिचे बंद डोलती
साथ तयांची तालानी
चकमकणाऱ्या किरणांनी
अन् खळखळणाऱ्या लाटांनी
खेळ मांडले लाज सोडुनी
आतुरलेल्या स्पर्शांनी

रचना पिनाकपाणि

# दादा वहिनीचा बोका

उघडतां दार मी समोर धावे नाका
मज आणुन द्या तो दादा वहिनींचा बोका ।धृ।

ती आई पळाली पणतू बघण्यासाठी
सोपवून घर हे सारे माझ्या गांठी
हा बोका उरला मजला सेवेसाठी
तो गमावला तर काय कथूं मी लोका ?
मज आणुन द्या तो दादा वहिनींचा बोका ।१ ।

धावले पकडण्या त्याला परसू दारी
बघतांना दमले शोधुन झुडुपे सारी
मुरगळून पाय मी झाले अबला नारी
दार झाकतां बोट चिमटुनी हाती आला पोका
मज आणुन द्या तो दादा वहिनींचा बोका ।२ ।

ओकतो हागतो मुततो कितिदां बाई
हा उडी टाकुनी चिमण्या पक्षी खाई
अडवण्यास जातां झटकन पळुनी जाई
धाप लागुनी हृदयाचा ह्या चुकतो माझा ठोका
मज आणुन द्या तो दादा वहिनींचा बोका ।३ ।

माहेरी येउन सासुरवाशिण झाले
तुमचे ना माझे कवतुक त्याचे चाले
हा सागर तरुनी कशास येथे आले ?
अंत पाहतो छळण्यासाठी श्वशुर माझा तो का ?
मज आणुन द्या तो दादा वहिनींचा बोका ? ।४।

कवि :- पिनाकपाणि

---

# एकसष्ठावं वरिस लागलं

एकसष्ठावं वरिस लागलं , तुज आते मेहुणी
यास्तव सुचली , आज मला गे , तुजसाठी लावणी

हा वृद्धपणाचा धाक तुला जरि , दाविल तो आंकडा
आरसा जवळ धर , ज्वानिची बहर बघ , सत्य ते सांग मग ,
दिसतो ना फाकडा
अजुन न सरला पहा गडे तंव , ज्वानीचा चौकडा
निरखुन पाहतां मराठमोळ्या , पुरुषांना गे , दिसशी तूं देखणी
यास्तव सुचली , आज मला गे , तुजसाठी लावणी .... (1)

कापले केंस जणुं , गवतावरुनी , फिरवला लॉनमोवर
कुरळे काळे केस मनोहर , त्याचि कुणा न येई सर , अजून काळेभोर ,
तुकतुकीत डोईवर

नथ बुगडी अन् नौवारी साडी , सारं जमलं बघ सुंदर
लावण्याची खाण पाहुनी , माझी विस्फुरते पापणी
यास्तव सुचली , आज मला गे , तुजसाठी लावणी .... (2)

बोलशी बहर , तंव मृदुलपणाची कहर , अन् हास्य तें मधुर
डॉक्टर मुलगी , मुलगा सलगी , तंव धाकामधि नवरा वागी ,
वाढली चतुर लेकुरं
हेवा वाटुन शेजारी , अन् घरकुल सारी , जळती बघ भरपुर
फिकाच पडतो स्त्रीगण सारा , तूं नेसतां शालु पैठणी
यास्तव सुचली , आज मला गे , तुजसाठी लावणी .... (3)

वाकून हांत धरि इंग्रजिभाषा , हांती जेंवी पडते तंव लेखणी
काव्याची अद्भुत शैली , शब्दांची घेउन थैली ,
जणु शेलेनें वर्षा केली , स्वर्गामधुनी झणी
तंव काव्याची रचना ही तर , साहित्यानें भरलेली छावणी
राजमहल जणु कंट्रीमधला , शोभशी त्यांत तूं मलिकांची राणी
यास्तव सुचली , आज मला गे , तुजसाठी लावणी .... (4)

कवि :- पिनाकपाणि

---

# ॥ आजचे कुरुक्षेत्र ॥

जैसा धृतराष्ट्र अज्ञानी ।
अंध तें मुसलमानी ।
मूषक तैसें प्रसवूनी ।
बहु जन्मले ।१।

पार्था सारथ्य श्रीकृष्णाचे ।
विषादी सार्थक जन्माचे ।
कां न मिळे जीवीं सध्याचें ।
बहुजन पंडितांतें ।२।

अर्जुनविषाद नोहे जनतापक्षी ।
तरी सारथी न मिळे अनेक लक्षी ।
म्लेंछ गुंतले महीतळ भक्षी ।
कौरवा जैसें ।३।

उध्वस्तिली सहस्त्रावधि ।
पीर बैसले त्यामधीं ।
अवस्था टळे न कधी ।
देऊळांची ।४।

जैसीं पांडवें इच्छिली पांच खेडी ।
कौरवें म्हणितले न मिळे काडी ।
म्हणिती जन्मभूमी सोडी ।
तैसें मौलवीं ।५।

राष्ट्रद्रोही रक्षिती अल्पसंखीं ।
अन्याय प्रगटे बहुजनमुखीं ।
कैसे मिरविती राज्यपालखी ।
जाणो न ये ।६।

कां चेतविती पाताळवासी[1] ।
पुरवुनी धनसामुग्रीसी ।
करविती शिथिल भारतवासी ।
येशूसाठी ।७।

[1] अमेरिकन्स्

कां माठ भरिले तेलांनी ।
ओढिले रथ उंटानीं[2] ।
शमविली तृष्णा पैशानी ।
पीरांसाठी ।८।

जैसें बापूजी अवतरले ।
तैसे रामकृष्ण जन्मले ।
अखिल भारतियांची देउळे ।
तेथ होत ।९।

जेथ हिंदुमुस्लिमुख्रिस्तु नोहे ।
तयांची स्मारकें ऐसे पाहे ।
रक्षण होवावे यांचे कां हें ।
दुर्लक्षिताती ।१०।

बहुनारी बहुपुतपुत्री ।
तेथ दारिद्र्याची कात्री ।
सांगावे जोडुनि मैत्री ।
एकेन्यायीं ।११।

जो कारण बहुजनहितांसी ।
तोचि भला अशेष जनांसीं ।
नोहे परका अल्पांसी ।
न्यायधर्म ।१२।

म्हणवूनी अल्प दुर्लक्षिले ।
भले मिष्ठांन्नी पोखले ।
तेथ बहुजन हेटाळिले ।
तर्क नोहे ।१३।

हा द्वेष नसे पीरांशी ।
तोचि न घडे येशूपाशी ।
येथ राज्यकर्ता फांशी ।
उचित भासे ।१४।

नाठाळ जो राजकारणी ।
माथी विरोधमत लाठी हाणी ।
म्हणतसे पिनाकपाणि ।
अवधारिजो जी ।१५।

कवि :- पिनाकपाणि

[2] अरब राष्ट्रांनी

## सावधान !!!

नितम्ब पसरट , सपाट छाती , तिरळा डोळा , दांत पुढे
अंतरपाटा आड जानकी , बोहल्यावरती राम चढे
सावधान हा शब्द ऐकतां , पायीं लटपट घाम फुटे
ढेंगा टाकत पळतां पळतां , ब्रह्मचर्य तें त्यास पटे

कविः- पिनाकपाणि

---

## ही एकसष्टी

नको उगा गे आज सखे तूं होऊ कष्टी
सुहास्य वदने सामोरी हो आज तुझी ही एकसष्टी ॥धृ॥

सुखसंवादे गेली वर्षे
विश्व देखिले संगति हर्षे
श्रावणी अमृतधारा बरसे
माधुर्याने फळे वाढली
जणु शबरीची बोरे उष्टी ॥१॥

कष्ट सोशिले किती जीवनी
कुणि न पुसिले जरी या वनी
धुसपुस कधीहि नसे तंव मनी
आरोग्याची साथ मिळाली
अजुन न आली हाती यष्टी ॥२॥

नव्हते पूर्वी संवादास्तव
अबोल जरि तूं होते वास्तव
घडल्या घटना अनेक त्यास्तव
बोल सखे तूं गुलगुल कानीं
सांग सुखाच्या घडल्या गोष्टी ॥३॥

पिनाकपाणि

---

## Wedding Vows –

**You are not self-centered,**
**Neighter am I.**
**You are like planet earth**
**Revolving in my sky**
**(Woman: I am like planet earth**
**Revolving in your sky.)**
**I am a poem**
**You are the poetry**
**(Woman: You are a poem**
**I am the poetry)**
**I am the soul**
**within your body.**
**(Woman: You are the soul**
**within my body)**
**Let's join hands**
**And be my only wife**
**(Woman: Let's join hands**
**I'll be your wife)**
**For ever lasting loving,**
**And happy family life.**
**Stand besides me,**
**Solid like a rock,**
**And present to the world**
**An exemplary wedlock.**

**Pinaakpaani**

---

## Heavenly Happiness.

**Going down the street during my morning walk,**
**Saw a little girl playing in a neighborhood park.**

**She did'nt think that I was a stranger,**
**Was not frightened with my dark skin color.**
**Smiled and blew a kiss in an affectionate way,**

Gave heavenly happiness and made my day.

What was my religion? What was my name?
Country of my origin or any devilish fame?
What was my gender and what was my age?
Never crossed in the mind of that innocent sage.
Waved and smiled but never ran away,
Gave heavenly happiness and made my day.

Her eyes were telling love thy neighbor.
With peace on earth the heaven is right here.
Her pupils were having absence of fear,
Was that the God that I should pray?
That gave heavenly happiness and made my day.

(Pinaakpaani) Ashok Basargekar

---

## Guaranteed Ticket to Heaven

What a deal!!! You have a guaranteed ticket to the heaven
All you have to do is kill yourself and kill innocent seven.
More you kill the seat is more certain
But at least you have to do is to kill minimum seven.

He says,
Listen boys, girls, men, and women of all descent
Doesnt matter if you kill innocent
Not even necessary to use your talent.
All you have to do is to kill minimum seven.

Dont have to go to school of any kind
No need to serve poor, hungry or the blind.
Just go crazy out of your mind
All you have to do is to kill minimum seven.

Peaceful living with your neighbor
Cant bring joy and happiness forever
Hail to the misery of death and torture
All you have to do is to kill innocent seven.

Did he come from the heaven to tell this is true?
Just points at his book of lines very few.
Telling all people that his message is not new
All you have to do is kill innocent few.

(Pinaakpaani) Ashok Basargekar

---

## Your fifty years.

Deepak Deepak pucker up your lips
Take a few sips and say Cheers!!
You have completed to day your fifty years.

You have earned your gray hair
with experience solid.
Show them with pride
now every thing is valid.
Gathered to support both of your sisters
You have completed to day your fifty years.

Look how proud are four of your nieces
Your support has given them smiley faces.
Sister in law and sisters show joy in their tears
You have completed to day your fifty years.

Your father has given you a key to success
Mothers love is always at your access
Let your son follow the pioneers
You have completed to day your fifty years.

(Pinaakpaani) Ashok Basargekar

---

## आरती श्रीसत्यनारायणाची

मस्तकाची सीमा अन्तरिक्षासी
चरणांची युगुले पृथ्वीपाठीसी।
शय्येसाठी शेष नाभी आकाशी
ऐसा तुमचा महिमा नारद मुखासी॥
जय देव जय देव जय नारायणा
सत्यस्वरूप दावा तव भक्तगणा॥ धृ॥

ब्राह्मणमुख झळके चेहरा ज्ञानाचा
वैश्यांचा विसावा विशाल छातीचा
कोट्यावधि क्षत्रिय जणु आकार बाहूंचा
श्रमिकांचे चरण तुझे मेळा शूद्रांचा
जय देव जय देव जय नारायणा
सत्यस्वरूप दावा तव भक्तगणा॥ १॥

निर्मल मन जैसे शीतल चांदणे
सूर्याचे तेज दावी नयन कोंदणे
अग्निदेव मुखी इन्द्र हासणे
चैतन्य श्वासातुन नित्य वाहणे
जय देव जय देव जय नारायणा
सत्यस्वरूप दावा तव भक्तगणा॥ २॥

मन मागे राही वेग उमगेना
दगडाहुन स्थिरता तरी का न भेटेना
पिनाकपाणि शोधे तुज राना वना
जवळ सखा तूं रे अन्तरि असताना
जय देव जय देव जय नारायणा
सत्यस्वरूप दावा तव भक्तगणा॥ ३॥

कवि पिनाकपाणि

## मी सहज कॉल केला

सणा कारणा विना सहज मी आज कॉल केला
तुझी नि माझी प्रीत असे हे एकचि सांगायाला

मकर नसे संक्रांत नसे तिळगुळ वाटायाला
माघातिल शिवरात्र नसे फुलपात्र नसे हार गुंफण्याला
सणा कारणा विना सहज मी आज कॉल केला
तुझी नि माझी प्रीत असे हे एकचि सांगायाला॥ १॥

फाल्गुन महिना धूलिवंदना नसे रंग पंचमी
चैत्र पाडवा गुढी उभी वा नसे राम नवमी
सणा कारणा विना सहज मी आज कॉल केला
तुझी नि माझी प्रीत आगळी हे एकचि सांगायाला॥ २॥

नारद नरसिंहाच्या जन्मा नसे आज वैशाख
ज्येष्ठ पौर्णिमा आणिक नाहित वटाभंवति पोषाख
सणा कारणा विना आज मी सहज कॉल केला
तुझी नि माझी प्रीत खरी हे एकचि सांगायाला॥ ३॥

आषाढातिल भक्तगणांच्या रांगा ही नाहीत
श्रावणधारा अजून नाहित करीत संगीत
सणा कारणा विना आज मी सहज कॉल केला
शपथ गळ्याची प्रेम खरे हे तुजला सांगायाला॥ ४॥

भादवा म्हणावा तर श्री गणेश नाही आले
अश्विन महिना विजया दशमी सुवर्ण नच वाटले
सणा कारणा विना आज मी सहज कॉल केला
नसे विसरला प्रेमभाव हा तुजला सांगायाला॥ ५॥

दीपावलि ना लक्ष्मीपूजन ना भाउबिजेच्या भेटी
कार्तिक नाही मृग ही नाही पडतील कधी का गांठी
सणा कारणा विना आज मी सहज कॉल केला
तुझी नि माझी प्रीत निरंतर हेची सांगायाला॥ ६॥

पिनाकपाणि

# लाजाहोम

वर :

तू निःस्वार्थी,   मी निःस्वार्थी
आपण दोघे या संसारी

तू पृथ्वी मम अवकाशी
अखंड राहो तुझीच फेरी

मी कविता अन् तुझ्याच ओळी
तू वृन्दावन मी तेथे माळी

शरीर तू  मी असे चेतना
स्वर होइन मी तू गाताना

विश्वंबर,   तू त्याची माता
अग्नी साक्षी तू मी फिरता

वधुः

तू निःस्वार्थी,   मी निःस्वार्थी
आपण दोघे या संसारी

मी पृथ्वी तव अवकाशी
अखंड राहो माझी फेरी

तू कविता मी त्यातिल ओळी
मी वृन्दावन तू त्याचा माळी

शरीर मी पण तुझी चेतना
स्वर होशी तू मी गाताना

विश्वंबर,   मी त्याची माता
अग्नी साक्षी मी तू फिरता

कविः पिनाकपाणि

---

# पाणिग्रहण

तुझ्या बापानं चारदा पुसलं
माझं पदरात घे तू बाहुलं

पदरात घ्यायचं तूं का बाहुलं
तुझ्यामाझ्या प्रेमानं सूत सारं जमलं

प्रेमच घेणारं प्रेमच देणारं
तुझं माझं प्रेम हाय् हेच न्हाय का खरं

सागराला येउन आकाश जसं भिडतं
माझ्या अंगात घालायचं तूं हाय कुडतं

तुझ्या बापानं दिलं असं न्हाय मिणतं
तू आकाशाची गंगा हे साऱ्याना कळतं

देवाची आण हाय्  शपथेवारी सांगतो
तुझ्यावाचून कोणी न्हाय संसारी पाहतो

कवि : पिनाकपाणि

---

# गोट्या रे गोट्या

कृष्णाई येथे दूर वरुनि जी येते
हा सागरगोटा स्पर्श करुनि ती जाते

त्या तिथे दूरवरि खळखळणारे नाते
दगडावर दगडे किती फोडती माथे
घामाने चिंबुन ओलेती ती होते
या इथे शेवटी शांत सागरा मिळते

या शुभ्र रेतिची शय्या तुजला आहे
तूं जरी एकला पिता सागरा पाहे
निजवाया तुजला माता जवळी वाहे
स्वर्गीय सुखाचे मोल यावरी नोहे

पुसतील तुला ते निंदेने रे सारे
असताना आम्ही निरोपास तूं का रे
देऊनि डाग तुज कृतघ्नतेचे वारे
फासून शेण पापांचे तुजवरि करतिल रे बावरे

तूं शांत रहा तूं सुखी रहा हे तव आंसू पुसते
अश्रू घेउनी शांत सागरीं विलीन ती होते
पिताश्री सागर माता कृष्णा अद्भुत ऐसे नाते
सप्तसुरांच्या नादाने ती गोव्यासाठीं गाते

पिनाकपाणि

---

## मनाचा आरसा

तुझ्या अंगाशी चटके
पुण्यापापाचे फटके
तुझ्या मनाचा आरसा
खऱ्या खोट्याचा वारसा.
इतरां दिसेल तो कसा?
तुझ्या रूपाचा रे ठसा.
कोणी कांहीहि म्हणील
मन तुझा रे वकील.

पिनाकपाणि

---

# ठेंच. लेखक– पिनाकपाणि

" बापू, अठ्ठेचाळीस वर्षापूर्वी मी लिहिलेला निबंध तुमच्या परीक्षेतून उतरला नव्हता. हा तरी मला पासापुरते मार्क मिळवून देईल अशी आशा आहे."

---

" पिनू, असला कसला प्रसंग तूं निवडला आहेस? हा का तुझ्या जीवनांतला अविस्मरणीय आहे? जो प्रसंग मनामध्ये कायमचा टिकून राहतो तो अविस्मरणीय. तुला आठवते? मागे एकदां तूं आईस चपलाने मारले होतेस तें ? तो तुला अविस्मरणीय वाटत नाही का? तो प्रसंग तूं निवडला असतास तर मला तुझे नक्कीच कौतुक वाटले असते."

बापूच्या ह्या उद्गाराने माझ्या हृदयांत कलवलून गेले. डोके भणभणू लागले. डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. मन अंतर्मुख झाले. गळा भरून आला. बापूच्या प्रश्नाला माझ्याकडे उत्तर नव्हते. १९५२ सालचा हा प्रसंग आहे. त्यावेळी मी बारा वर्षाचा होतो. बापू माझा नऊ वर्षाने मोठा असलेला भाऊ. घरामध्ये मीच सर्वात लहान. त्यावेळी मी शहापूरच्या चिंतामणराव हायस्कूलमध्ये मराठी सहावी किंवा इंग्रजी दुसरीत शिकत होतो. आमचे पहिल्या तासाचे मास्तर म्हणजे क्लास टीचर हिंदी शिकवणारे नाडपुरोहित सर. हिंदी शिकवण्या खेरीज त्यांना आमची हजेरी घेणे, प्रगती पुस्तके तयार करून आम्हाला वाटणे, त्यावर पालकांची सही करून परत करण्यास सांगणे, दर महिन्याची फी गोळा करणे ही पण कामे होती. मला प्रगती पुस्तकावर बापूची सही घ्यावी लागत असे. मास्तरांनी तपासून परत केलेले तिमाही, सहामाही, नऊमाही, व वार्षिक परीक्षेचे पेपर्स बापू न चुकता पहात असे. त्यांत कोठे काय चुकले, काय सुधारणा करता येतील, व मी न सोडवलेले प्रश्न माझ्याकडून करून घेणे हे तो आवडीने बघत असे. मराठीचा पेपर मास्तरांकडून मला नुकतांच मिळाला होता व तो बापूच्या हातात पडला होता. एका पानावरील " माझ्या जीवनातील अविस्मरणीय प्रसंग" ह्या शीर्षकाखाली मी लिहिलेल्या मजकुरावर नजर टाकून बापूने हे उद्गार काढले होते.

आज मला मी काय लिहिले होते ते जसेच्या तसे सांगता येणार नाही. पण मी निवडलेला प्रसंग आमच्या पुणे ते बेळगांव ह्या प्रवासांत घडलेला होता हे मात्र चांगले आठवते. त्यावेळी मी दहा वर्षाचा होतो. मी आई व बापूबरोबर काही कारणानिमित्त पुण्याला गेलो होतो. पुण्यापासून धारवाड पर्यंत त्यावेळी आगगाडीने मीटर गेजवरून सरळ जाता येत होते व गाडी न बदलतां बेळगांवपर्यंत जाता येत होते. आतां पुणे कोल्हापूर ब्रॉड गेज असल्याने सांगलीला उतरून सांगली ते बेळगांव जुन्या मीटर गेजने गाडी बदलून जावे लागते. आम्ही बेळगांवला सरळ जायचे सोडून मध्ये किर्लोस्करवाडीला उतरलो होतो. किर्लोस्करवाडीला त्यावेळी माझी आतेबहीण शांताक्का व तिचे यजमान अनंतराव रहात असत.

अनंतराव शंकरराव किर्लोस्करांच्या कारखान्यात काम करत असत. एक दिवस त्यांच्याकडे राहून व त्यांना भेटून पुढे जायचे असा आमचा बेत होता. शांताक्काकडे तेंव्हां तिच्या सासरच्या कोणीतरी बाई व त्यांचा एक आठ वर्षाचा मुलगा उतरले होते.

" बरं झालं बाई तुम्ही आलांत ते. ह्यांना कोल्हापूरला जायचे आहे. मिरजेपर्यंत तरी तुमची सोबत होईल." शांताक्काने आम्हाला पाहून आनंद व्यक्त केला.

आईच्या व शांताक्काच्या बऱ्याच गप्पागोष्टी झाल्या. मी व बापूने अनंतरावांबरोबर जाऊन त्यांचे कामाचे ठिकाण पाहिले. दुसरे दिवशी रात्री त्या बाई व त्यांच्या मुलाबरोबर आम्ही परतीच्या प्रवासाला निघालो. गाडीत बरीच गर्दी होती त्यामुळे आई, त्या बाई, मी, व त्या मुलास स्त्रियांच्या डब्यांत बसवून बापू दुसऱ्या डब्यांत बसावयास गेला. बायकांच्या डब्यांत बसणे मला फारसे आवडले नाही. मला बापूजवळ बसायचे होते. रात्र होती. गाडीत झोपायचेच होते. त्यामुळे मी फारशी कुरकूर केली नाही.

पहाटे कोठल्या एका लहानशा स्टेशनावर " चाय गरम" ह्या चहा विकणाऱ्याच्या आवाजाने मला जाग आली. बरेच लोक गाडीतून उतरून प्लॅटफॉर्मवरील नळावर तोंड धूत होते. मीहि तोंड धुउन बापूच्या डब्यांत जातो असे आईस सांगून खाली उतरलो. माझ्यामागे हा आठ वर्षाचा मुलगापण उतरला आहे ह्याची मला कल्पना नव्हती. गार्डाने शिट्टी वाजवली. हिरवा बावटा फडफडवला. गाडी सुरू झाली हे पाहतांच मी धावत पळत बापूचा डबा गाठला व वर चढलो. माझ्यामागे हा मुलगा पण पळत आहे व चालत्या गाडीत चढणे त्याला जमणार नाही हे दिसत होते. गाडीने वेग

घेतला. हा मुलगा प्लॅटफॉर्मवर गाडीच्या मागे धावत व रडत होता हे दिसत होते. " पोर मागे राहिले रे" म्हणून डब्यातील लोकानी आरडाओरड केली. मी बापूस हा आपल्या पाहुण्याबाईचा मुलगा असल्याचे ओरडून सांगितले. गाडी प्लॅटफॉर्म सोडून बरीच दूर गेली होती. " साखळी ओढा, साखळी ओढा" म्हणून बऱ्याच लोकांनी ओरडाओरड केली. शेवटी बापूनी साखळी ओढली व गाडी थांबली. गार्ड आमच्या डब्यापर्यंत येईपर्यंत बापूने खाली उडी टाकली होती व तो प्लॅटफॉर्मच्या दिशेने धावला.

मुलाकडे पहायला कोणीतरी प्रौढ माणूस आहे हे पाहून गार्डाने गाडी पुढे चालू करण्याचा निर्णय घेतला व गाडी सुरू झाली. खिडकीतून मला बापू व तो मुलगा धावणाऱ्या गाडीच्या दिशेने पळत असल्याचे दिसत होते पण मी काही करू शकलो नाही. इतर प्रवाश्यांनी माझी" ते मागच्या गाडीने येतील" म्हणून समजूत काढली. मिरज जंक्शनवर मी, आई, व आमच्या पाहुण्या बाई उतरलो. आमच्या पाहुण्या बाईना माझा बराच राग आल्याचे दिसून येत होते.

" माझ्या पोरालाच अक्कल नाही हो! भावाला बघूसं झालं म्हणून तुमचा पोरगा खाली उतरला. माझ्या पोरानं खाली उतरायची काय गरज होती का?" वगैरे तिचे तोंड चालू झाले. दुपारचे दोन झाले तरी बापू व त्या मुलाचा पत्ता नव्हता. " एव्हाना आम्ही बेळगांवला जाऊन घरी पोहोचलो असतो. काय करायचं?" आईने आपले विचार व्यक्त केले. हा सगळा माझाच दोष ठरला. शेवटी एका माल गाडीने बापू व तो मुलगा तीनच्या सुमाराला आमच्यासमोर हजर झाले. चार वाजतां आलेल्या कोल्हापूरकडे जाणाऱ्या पॅसेंजर ट्रेनमध्ये त्यांना बसवून मी आई व बापू बेळगांवकडे निघालेल्या गाडीत चढलो.
प्रसंग साधाच होता. पण परीक्षेच्या गडबडीत जो सुचला तसा मी लिहिला होता.

माझ्यापेक्षा सात वर्षाने मोठी असलेली माझी बहीण ताई, लग्न होऊन सासरी जाऊन दोन वर्षे झाली होती. तिचे लग्न व माझी मुंज हे समारंभ कोल्हापूरला आमच्या गणपूकाकांच्या घरी झाले होते. अण्णा, म्हणजे माझे वडील तिच्या लग्नानंतर दोन तीन दिवसातच वारले. ताईच्या लग्नाआधी अण्णांची प्रकृती अधिकच बिघडली होती. शहापूरच्या आचार्य गल्लीतील जागा सोडून त्यांना टिळकवाडीतील मोकळी हवा मानवेल म्हणून आम्ही तेथे एका चाळीत रहावयास आलो होतो. लग्नाला त्यांना नेणे शक्यच नव्हते. बापू त्यांच्या सेवेला राहिला व आम्ही सर्व कोल्हापूरला गेलो. काकांनी माझ्याबरोबर आपल्या मुलाची, म्हणजे माझा चुलत भाऊ अनिल, याची मुंज आणि ताईचे लग्न आपल्या बंगल्यासमोर मंडप घालून मोठ्या थाटाने केले. अण्णांच्या अनुपस्थितीमुळे विठूकाका व पद्माकाकू माझ्या मुंजीस आई वडिलांठिकाणी बसले होते. गणपूकाका व कमलाकाकू अनिलच्या मुंजीसाठी बसले होते. त्यानीच ताईचे कन्यादान केले. आई मात्र हा सोहळा दूरूनच डोळ्यातून अश्रू काढीत पहात होती. लग्न झाल्यावर लागलीच आम्ही ताई, भाऊजींसमवेत टिळकवाडीला परतलो. अण्णा जणुं चातकासारखी आमची वाटच पहात होते. नव दांपत्याना पाहून त्यांच्या डोळ्यांतून आनंदाश्रु वाहू लागले. ताई व भाऊजींनी त्याचे पाय धरून नमस्कार केला. " लक्ष्मी नारायणावाषिशम् भवंतु" एवढेच शब्द त्यांच्या मुखातून बाहेर पडले व त्यांनी प्राण सोडला.
माझ्या वयाच्या दहाव्या वर्षीच वडील गेल्यामुळे त्यांच्याबाबतच्या माझ्या आठवणी आज बऱ्याचश्या अंधुक अंधुक अश्या आहेत. अण्णा वारले त्यावेळी बापू राणी पार्वती देवी कॉलेजमध्ये नुकताच सायन्सच्या पहिल्या वर्षात शिकत होता. मी पाचव्या ईयत्तेत चिंतामणराव हायस्कूलमध्ये इंग्रजीच्या पहिल्या वर्षात शिकत होतो. वडिलांच्या मृत्यूमुळे घरावर एक संकटच कोसळले होते. संकटाची जाणीव होण्याइतके माझे वय नव्हते. अजून आठवते. वडील वारल्या मुळे बरेच नातेवाईक भेटावयास येत होते. हत्तरवाटहून आमची आत्या आली होती. माझ्याकडे पाहून तिला कींव यायची . ताईच्या लग्नासाठी केलेल्या फराळातील लाडवाचा एखादा तुकडा मला प्रेमाने द्यायची. मीहि वडील वारले आहेत ही गोष्ट विसरून तो गोड पदार्थ मुकाट्याने तोंडात टाकत होतो. घरून करून आणण्या साठी शाळेत साठे मास्तरांनी दिलेली गणिते न करता शिक्षा चुकवण्या साठी मात्र घरी वडील वारले आहेत हे कारण देत होतो. शाळेतील मास्तरांपासून घरी नातेवाईक माझी कीव करीत होते. आज ते सारे मला चटका लावून जाते.

आतां यापुढे काय करावयाचे याचा निर्णय बहुतेक माझ्या आईने व माझ्यापेक्षा अठरा वर्षाने मोठा असलेला सर्वात मोठा भाऊ दादा याने ठरवले असावे.

श्यामभाई माझ्यापेक्षा सोळा वर्षांने मोठा. त्याने पण त्यावेळी या प्रसंगाला मोठ्या धैर्याने तोंड दिले असणार. सांत्वनाचा देखावा झाल्यावर सारे नातेवाईक आपापल्या घरी परतले. घर रिकामे झाले. घर कसले ? भाड्याची जागा होती ती. वडिलानी दम्याच्या विकाराने वकिली सोडून तालुक्याचे गांव गडहिंग्लज, सोडले तेंव्हापासून संकेश्वर, शहापूर, टिळकवाडी या ठिकाणी मिळेल तेथे भाड्याने जागा घेऊन आम्ही त्यांच्या समवेत रहात होतो. गडहिंग्लजचे घर विठूकाका तेथे मास्तर होते त्यांना अण्णानी देऊन टाकले.
बाहेरच्या भिंती व छप्पर पत्र्याचे. त्याला सारे पत्र्याचे घर असेच म्हणायचे. मागच्या बाजूला मात्र अण्णानी ते चांगले वाढवले होते. त्याला आम्ही नवे घर म्हणत असूं. शिवाय मागे गोठा, गोठ्यांत म्हैस, तिचे वासरूं, असा आमचा गडहिंग्लजचा संसार होता.

तेथे मी मुल्ला मास्तरांच्या शाळेत मराठी पहिलीत होतो. डॉक्टर गुण्यांचा मुलगा प्रकाश, गुंडोपंत कुलकर्णी मास्तरांचा मुलगा, तो पण प्रकाशच, आपट्यांचा किशोर, खाडिलकर मास्तरांची मुले अविनाश आणि सुरेश, असे माझे मित्र मंडळ होते.

घरामध्ये गरिबाच्या एखाद्या मुलाबरोबरच अण्णानी माझी आते भावंडे पण हायस्कूलमध्ये शिकायला ठेवली होती. अजून अंधुकसे आठवते. जिरलेले धोतर, अंगात सदरा व कोट, डोक्यावर पांढरा रुमाल बांधलेला, असा साधाच पोषाख करून ते कोर्टात जात असत. सायंकाळी सोप्यावर मांडी घालून व मांडीवर पाय हलवीत तास अन् तास विचार करीत त्यांचे मित्र शिनोपंत, खाडिलकर मास्तर किंव्हा आणखीन् कोणाबरोबर बुद्धीबळ खेळत बसायचे. मी पण तेथे अण्णा केंव्हा शत्रूचे प्यादे, घोडा, अगर उंट मारतात व तो मला काबीज करायला मिळतो ह्याची वाट पहात बसत असे. बऱ्याच मोठ्या घनघोर युद्धाचा प्रसंग माझ्या मनात येत असे. व त्यात मी रंगून जात असे. खेळातील माझ्या वडिलांच्या शौर्याबाबत माझा विश्वास उचंबळून जायचा. वयाच्या सहाव्या वर्षी मला बुद्धीबळातील कळत होते अशातला प्रकार नव्हता. उंट तिरका जातो, हत्ती उभा व आडवा जातो, घोडा अडथळ्यावरून उडी मरून जाऊ शकतो एवढेच मला त्यातले ज्ञान.

आई एवढ्या मोठ्ठ्या म्हशीची न घाबरता धार काढते, तिला धुते, पुसते, प्रेमाने अंबोण खायला देते या साऱ्याचा मला खूप अभिमान वाटायचा. आईला माझी काकू, माझी सारी चुलत भावंडे व इतर लोक थोरल्या आई म्हणत असत. माझ्या भावांच्या व ताईच्या मुलांनी व माझ्या तीन्ही वहिनींनी पण पुढे तेच नांव चालू ठेवले. महात्मा गांधीवधानंतर गडहिंग्लजमध्ये ब्राह्मणांची घरे लुटणे व जाळणे हे प्रकार बरेच झाले. डॉक्टर गुण्यांचा बंगला व दवाखाना आगीत भस्म झालेला मी पाहिला.

" वकिलांच्या घराला हात लावायचा नाही ते सोडून इतर घरे लुटली तर चालतील" असे गुंड म्हणत होते असे आईने पुढे बऱ्याचवेळा म्हटले होते. अण्णांच्या परोपकार बुद्धीचे हे फळ आहे व समाजात त्यांचे एक आदराचे स्थान होते याचा अभिमान तिच्या डोळ्यात सतत दिसत असे. ह्याचा प्रत्यय मला पुढे अण्णांच्या मृत्यूनंतर आल्याखेरीज राहिला नाही.

माझी पांचवीची परीक्षा व बापूची फर्स्ट ईयर सायन्सची टर्म संपेपर्यंत आम्हाला तेथेच राहणे भाग होते. शाळा जवळ म्हणून आम्ही शहापूरला कचेरी गल्लीत एक जागा भाड्याने घेतली होती. तेथून जवळच माझी मावस बहीण कपडे शिवण्याचे दुकान काढून आपला संसार चालवत होती. तिला भेटायला मी व आई बऱ्याचवेळा तिच्या दुकानावर जात असूं. एकेदिवशी असेच तिला भेटून आम्ही घरी परत येत असताना कचेरीसमोर आम्हाला पाहून एक म्हातारा दाढीवाला मुसलमान गृहस्थ आमच्या समोर थांबला. मोठ्या आस्थेने त्याने आईला" आपण केशवराव वकीलांच्याच पत्नी ना?" अशी चौकशी केली व आपण वकील साहेबांचे जुने पक्षकार असल्याचे सांगितले. अण्णा वारल्याचे समजल्यावर त्याने बरीच हळहळ व्यक्त केली. आम्ही आतां कोठे राहतो वगैरे माहिती घेऊन तो निघून गेला. दुसरे दिवशी न विसरता त्याने आम्हाला एक मोठी फळांची टोपली भेट म्हणून आणून दिली. काहीहि संबंध उरलेला नसतांना अशावेळी आमच्याबद्दल एवढी आस्था एक मुसलमान गृहस्थ दाखवतो यातच अण्णांचे समाजात काय स्थान होते हे त्या लहान वयात मला कळून चुकले. कोर्टाची पायरी चढून आपले नुकसान करून घेऊ नका असाच सल्ला अण्णा नेहमी देत असत.

अण्णांकडून शिक्षण मिळण्याचे भाग्य मला लाभले नाही. त्यांच्या आजारानेच त्यांना बेजार करून टाकले होते. मग माझ्याकडे ते काय लक्ष देणार? माझ्या साऱ्या

मोठ्या भावांना त्यांच्याकडून संस्कृत, इंग्रजी, गणित वगैरे विषयांची शिकवणी मिळाली होती. शेंडेफळ म्हणून माझ्यावर त्यांचे लक्ष मात्र अवश्य होते. माझ्या शहापूरमधील मावस बहिणीला तीन मुले. मोठा मुलगा अरविंद माझापेक्षा तीन वर्षाने मोठा. दुसरा मोहन, माझ्याहून वर्षाने लहान. अलका त्याहून दोन वर्षाने लहान. मोहन व अलकाकडून मामा म्हणवून घ्यायला मला गंमत वाटायची. त्यांच्याबरोबर खेळतांना मात्र मामा भाच्यांचे नाते आम्ही विसरून जात असूं.

आचार्य गल्लीतील आमच्या राहण्याच्या जागेतील माजघरात अंथरुणांत पडल्या पडल्या अण्णा आमचा संवाद ऐकत होते.

" मी मांडलेला कोणताहि मुद्दा कोणी मोडू शकणार नाही" —- अरविंद

" आम्ही मोडून दाखवू" —— मी व मोहन

" दिव्याखाली नेहमीं अंधारच असतो " —— अरविंद

" यांत काय नवीन आहे ?" ——

आमचा चेहरा विरमुसला

अण्णानी मला माजघरातून हांक मारून बोलावले व मला दिवा लावावयास सांगितले मी दिव्याचे बटण दाबले व माजघरात चक्क प्रकाश पडला तेव्हा माझ्या डोक्यांत पण प्रकाश पडला माझा चेहरा उजळला माझा आनंद गगनांत मावेना व मी आनंदाने धावतच बाहेर आलो व अक्षरशः ओरडलो " विजेच्या दिव्याखाली अंधार नसतोच मुळी!! " .

वडिलांचे व मुलाचे नातेच हे असे असते. तें नाते माझ्या वयाच्या दहाव्या वर्षी तुटले. परीक्षा झाल्यावर मी इस्लामपूरला दादाकडे रहावयास गेलो. बापूचे शिक्षण तेथेच थांबले व तो नोकरीच्या शोधांत लागला. इस्लामपूरला तेथल्या शाळेत मी फक्त एकच वर्ष होतो. तोपर्यंत बापूला बेळगावातच पोस्टात कारकून म्हणून नोकरी लागली. बापूच्या पोटाचे बघणे, माझ्या शिक्षणाकडे पाहणे, व खेडेगावची शेती पाहणे हे सर्व टिळकवाडीत राहून सोपे जाईल ह्या विचाराने आईने मला घेऊन बापूकडे राहणे पसंत केले. माझे नांव परत शहापूरच्या चिंतामणराव हायस्कूलमध्ये घातले व सातवीपासूनचे माझे शिक्षण सुरू झाले. टिळकवाडीत आम्ही बुरलींच्या घरांत जागा भाड्याने घेतली होती.

घर धाब्याचे. त्यामुळे घरावर कौले नव्हती. घरमालक बुरली ह्यांचे प्रवेशदार समोरून होते. आमच्या जागेचा प्रवेश बाजूने होता. बाजूच्या अंगणात एक अंब्याचे व एक कवठी चाफ्याचे झाड होते. दोन्ही झाडाच्या मध्ये पायऱ्या चढून वर जायला आम्हाला प्रवेश होता. जागा आगगाडीच्या डब्यांसारखी होती. दरवाज्यातून आंत शिरल्यावर सोपा, उजव्या बाजूला बापूची झोपण्याची खोली, डाव्याबाजूला लांबुडके माजघर, त्यातच जरा पुढे गेले की स्वैपाकासाठी चूल असलेला भाग, पुढे एक पायरी उतरून स्नानगृहाची खोली, व मागच्या अंगणात जायचा दरवाजा होता. स्नानगृहात बंबासाठी लाकडे ठेवायची जागा व पाणी साठवायचे पिप होते. मागच्या अंगणातून उजवीकडे मालकांचे अंगण, व तेथे पाणी काढण्यासाठी चांगली बांधलेली गडगड्याची विहीर होती. विहीरीभोवती बराच भाग फरशीचा होता. अंगणाकडेला शेवटी असलेल्या औट हाउसमध्ये लिमये नावाच्या एक वृद्ध बाई व त्यांचा प्रौढ मुलगा भाड्याने रहात होते. आमच्या मागल्या दरवाज्यातून मागच्या अंगणात आल्यावर डाव्या बाजूला भांडी घासण्याचा व कपडे धुवायच मोठा दगड होता. बाजूला संडास व मागे भंगी बोळ.

आमच्या जागेसमोरील म्हणजे बुरलींच्या बाजूच्या अंगणात नेहमी बरीच झाडाची पाने पडत असत. चाफ्याची फुले पडून त्याचा सुगंध दरवळत असे. सकाळी उठून झाडूने पाने व कोमेजलेली फुले लोटणे हा एक आईचा कार्यक्रमच असे.

परसूदारी असलेल्या गडगड्याच्या विहिरीतून पाणी ओढणे व प्यायची आणि स्नानगृहातील भांडी भरण्याचे काम बहुतेक मी, घरी आला असेल तर मधूमामा, किंव्हा बापू करीत असूं.

मधूमामा लहानपणापासून कसल्यातरी अपघातामुळे आंधळा होता. आंधळा असूनहि त्याला एका ठिकाणी चैन पडत नसे. कमरेखाली धोतर, सदरा, कोट, डोक्यावर रुमाल म्हणजे पगडी, खांद्यावर हबशी टाकलेली, व हातात काठी घेऊन स्वारी नेहमी एका गावापासून दुसरीकडे अश्या दौऱ्यावर असायची. पण त्यातल्या त्यात त्याचा मुक्काम आमच्याबरोबर अधिक असायचा. आंधळ्याची दुसरी इंद्रिये तल्लख असतात म्हणे. मधूमामाला संगीताच्या मैफिलीत तबला छान वाजवता येते असे. लहानपणी ताई शास्त्रीय संगीत शिकत होती. मामाने तिला तबल्याची साथ अनेकदां दिली होती. संधी मिळेल तेव्हा कीर्तनकारांबरोबर त्याची

साथ असायची. त्याखेरीज मामाला जमीनीत पाणी कोठे लागेल तें सांगण्याची विद्या हस्तगत होती. खेडेगावीं शेतात माळावर कोठे विहीर खणावी ह्याचा सल्ला त्याच्याकडूनच मिळाला होता. घरी असला म्हणजे देवपूजेचे कामपण त्याच्याकडेच असायचे. त्याच्या सोवळे ओळे ह्या कल्पना अचाट होत्या. एकदा अंघोळ करून आला म्हणजे पूजा संपेपर्यंत त्याला कोणी हात लावावयाचा नाही. चुकून लागला तर स्वारी परत विहिरीवर जाऊन गार पाण्यानी अंघोळ करून यायची. शाळेला सुटी असली म्हणजे सुटीच्या दिवशी दुपारचे जेवण झाले कीं माजघरांत वामकुक्षी करीत पडलेल्या मामास व आईस एखादे पुस्तक, मासिक, अगर कादंबरी वाचून दाखवायचे काम माझ्याकडे असायचे. साने गुरुजींची श्यामची आई किंवा श्याम वाचून दाखवताना माझा गळा भरून येत असे व मामाच्या डोळ्यांतून घळा घळा अश्रू वाहू लागत असत.

शहापूरची माझी शाळा घरापासून जवळ जवळ एक दीड मैल दूर असावी. मी नेहमीं चालतच शाळेला जात होतो.

बरोबर कधी कधी टिळकवाडीतील माझे वर्गमित्र अशोक औंधकर, दामले बंधु ही चुलत भावांची जोडी असायची. आमच्या तुकडीमध्ये तीस ते चाळीस मुले असावीत. मराठीचे मास्तर कविवर्य सी. म. बापट होते. त्यांचा मुलगा नान्या म्हणजे नारायण नेहमीं वर्गांत पहिला यायचा. दुसरा नंबर शशी वेलंगीचा असायचा. पुढे बोर्डाच्या परीक्षेत मात्र शाळेत शशी पहिला आला. मी तेवढा हुषार नव्हतो. तरीही पहिल्या पांचामध्ये तरी नक्कीच असायचो. बापूची इछा मात्र मी पहिला यावा अशीच नेहमी असायची. माझ्या प्रगतीकडे त्याचे फार लक्ष असायचे. गणित, सायन्स, इंग्रजी, आणि संस्कृत ह्या विषयांचा अभ्यास तो जातीने करून घेत असे. मला दादापेक्षा त्याची शिकवणी आवडायची. दादाचा एकप्रकारचा दरारा व भय वाटत असे. बापू माझ्यावर प्रत्यक्ष कधीहि रागावत नसे. जी काही माझ्याबाबत त्याची तक्रार असे ती मला आईतर्फे नंतर कळत असे.

" किती बाबा उनाडक्या करशील. तुला केंव्हा समजायचे. अभ्यासात जरा लक्ष दे. तुझ्याकरतां मी जगते आहे. मी मेले म्हणजे सुटले बाबा." अशी आई बोलली म्हणजे मला बापूची माझ्याबद्दलची काळजी व विचार कळायचे.

वर्गामध्ये एकदां औंधकरने मला " आपण सायन्सचा प्रयोग करूया. व एक पाण्याचा कारंजा करूया" असा प्रस्ताव मांडला. प्रयोग साधाच होता. एक डालड्याचा रिकामा डबा घेऊन त्याला सायकलचा व्हाल्व बसवून डब्यात पाणी व हवा भरायची व दुसऱ्या भोकातून पाण्याचा फवारा कसा उडेल ते पहावयाचे. रिकामा डबा मिळवणे, सायकलचा व्हाल्व मिळवणे ह्या गोष्टी सोप्या होत्या. बापूच्या सायकलीच्या जुन्या व टाकाऊ ट्यूबचे व्हाल्व कापून घेणे सोपे होते. आई कडून रिकामा डालड्याचा डबा पण मिळाला. डब्याला व्हाल्व बसवायला नवसागर आणि कथील वापरून सील करावयाचे ठरवले होते. त्याला चार आणे लागतील असा अंदाज होता. बापू किंवा आईकडून मला दर महिन्याला शाळेची फी द्यायला तीन रुपये मिळत असत. चैन करायला वाव नव्हता. बापूकडून पैसे घ्यायचे धाडस झाले नाही. बापू कामावरून आल्यावर आपली पॅन्ट खुंटीला अडकवून ठेवतो व त्याच्या खिशात तेवढे पैसे नक्कीच असणार हे माहीत होते. शेवटी धाडस करून मी त्यातून चार आणे घेतले व किराणा मालाच्या दुकानातून नवसागर व कथील विकत आणले. उरलेले पाच सहा पैसे परत बापूच्या खिशात ठेवून दिले. बापूला ही गोष्ट लक्षांत आली असावी. कारण आईने मला बापूच्या खिशातून पैसे चोरलेस का ते विचारले. ही चक्क चोरी आहे हे मला आईने चोरलेस का असे म्हटल्यामुळे ध्यानांत आले. आपल्या भावाचेच पैसे चोरणे ही गोष्ट मला पण क्षम्य वाटली नाही. लागलीच ती मी आईपुढे कबूल केली व तिला मी परत पैसे आणून देतो असे सांगितले. मी तसाच ते नवसागर व कथील घेऊन दुकानदाराकडे गेलो व त्यास ते परत घ्यावे म्हणून विनवले. मी आईबरोबर तेथे नेहमी खरेदी करावयास जात होतो त्यामुळे त्याला थोडीफार ओळख होती. संपूर्ण काही भरपाई झाली नाही पण जेवढे पैसे मिळाले ते मी जसेच्या तसे आईकडे आणून परत केले. आमचा प्रयोग येथेच विरून गेला. मी मागितले असते तर बापूनें पैसे दिले नसते यातला प्रकार नाही पण बापू व मी यामधले शिस्तीचे नातें हे असे होते. बापूने किंवा आईने शिक्षेसाठी माझ्यावर कधी हात उगारल्याचे आठवत नाही.

शाळेतून परत आल्यावर मी बापूच्या इच्छेप्रमाणे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेत बरेच दिवस जात

होतो. नंतर दररोज माझे खास मित्र अशोक बेटगिरी आणि करमरकर यांचेबरोबर आगरकर रोडने मिलिटरी महादेवाच्या मंदिरापर्यंत फिरावयास जाऊन येत असे. आगरकर रोड म्हणजे तरुण तरुणींच्या घोळक्याने फिरावयास जाण्याचा एक प्रसिद्ध मार्ग होता. आमचे तीघांचे त्रिकुट मात्र जरा वेगळेच होते. मी बारा वर्षाचा सहावीत असलेला, बेटगिरी माझ्यापेक्षा वर्षाने लहान पांचवीत होता व करमरकर माझ्यापेक्षा सहा वर्षाने मोठा, कॉलेजकुमार होता. त्यांच्यापैकी कोणी बरोबर नसेल तर मात्र मी एकटाच बेळगांवच्या रेल्वे स्टेशनवर जाऊन बराचवेळ एका ट्रॅकवरून दुसऱ्या ट्रॅकवर मागेपुढे नेले जाणारे मालगाडीचे डबे पाहण्यात माझा वेळ काढीत असे. आई, मधुमामा, व बापूबरोबर सुद्धा बऱ्याच वेळा त्या महादेवाच्या मंदिरापर्यंत फिरावयास गेल्याचे आठवते. तेथल्या लष्करी तळावरील सैनिकांनी बऱ्याचवेळा मला लष्करात भरती व्हावे असा प्रस्ताव मांडला होता. मी तसे भरती होऊ का असे मी आईस विचारूनसुद्धा पाहिले होते. आईची इच्छा मात्र मी खूप शिकावे अशीच होती. कधी कधी मी बेळगांवच्या सार्वजनिक वाचनालयात जाऊन वर्तमानपत्रे व गोष्टीची पुस्तके वाचण्यात बराच वेळ काढीत असे.
एकटा असलो म्हणजे माझे मन नेहमी कोठल्यातरी स्वप्नसृष्टीत रमत असे. वर्तमानपत्र वाचले की क्रिकेटचा कप्तान माझ्या अंगात शिरायचा व मी शेकडो धांवा काढायचो. सिनेमातल्या नायकाची व खलनायकाची झुंज माझ्या हातवाऱ्यातून प्रगट व्हायची. एकदां मी माझ्या मनोसृष्टीत भरारी मारू लागलो की मला कशाचेहि भान रहात नसे. पु. ल. देशपांड्यांच्या गुळाच्या गणपतीतील नाऱ्या सारखी स्थिति होत असे. शाळेला सुटी झाली की कधी कधी मी कोल्हापूरला ताईकडे जाऊन थोडे दिवस रहात असे.

त्यावेळी ताई शाहुपुरीत लॉ कॉलेज समोरील मिटकरांच्या चाळीत एका भाड्याने घेतलेल्या घरांत रहात होती. मागच्या बाजूच्या गॅलरीमध्ये फरशीवर खडूने चौकोन काढून तिच्या भांडी घासणाऱ्या बाईच्या मुलीबरोबर लंगडी घालत छप्पापाणीचा खेळपण मी खेळलो होतो.

" कारटे!, बामणाच्या मुलाबरोबर खेळत काय बसलीस. चल मला मदत कराया." अशी ती बाई ओरडली कीं आमचा खेळ संपायचा.

ताई व भाऊजींच्या बरोबर बऱ्याचवेळा मी सिनेमे पहावयास जात होतो. सिनेमा पाहून आल्यावर त्यातील नायकाचा शूरपणा व त्याची खलनायकाबरोबर झालेली झुंज ही माझ्या मनांत कित्येक दिवस घर करून असायची. असाच एक सिनेमा त्यावेळी माझ्या मनांत बराच काल रंगला होता. दिलीपकुमारने त्यात डोंगराच्या कडी कपारीत एका गुहेत राहणाऱ्या टोळीच्या सरदाराचे काम केले होते. एका डोंगरा वरून दुसऱ्या डोंगरावर दरी व खोल दरीतील वाहणारी नदी पार करून जायला दोरखंडाने टांगलेला झुलता पाळणा तो वापरत होता. मोठाली चाके फिरवून त्याचे साथीदार तो पाळणा एकीकडून दुसरीकडे नेत होते. सिनेमातील नायिकेला खलनायकापासून वाचवायला त्याने या पाळण्यांत केलेली लढाई कित्येक दिवस माझ्या मनांत बसलेली होती. तेंच डोक्यांत ठेवून मी परत टिळकवाडीला परत आलो होतो. त्यावेळी माझ्या थोरल्या वहिनी व चार वर्षाचा पुतण्या सुरेशपणा घरी होता. सुरेश मला पिनूताता व आईला इन्नी असे बोबडे बोलायचा.

एकेदिवशी सकाळी मी बाहेरच्या अंगणांत स्वतःशीच खेळत होतो. एक सुतळी घेऊन मी चाफ्याच्या झाडापासून अंब्याच्या झाडापर्यंत बांधली होती. सुरेशचे एक चप्पल त्यांवर सिनेमातील पाळण्यासारके टांगले. खोल दरीतील नदीच्या आरपार मी तो पाळणा सरकवत होतो. नायकाला मारावयास खलनायक प्रयत्नांची पराकष्टा करीत होता. मी माझ्या कल्पना सृष्टीत रमलो होतो. छोट्या सुरेशने हे केंव्हा पाहिले ते मला समजले देखील नाही. काकाने आपले चप्पल घेतले हे समजल्यावर मात्र त्याने भोकांड पसरले. इकडे माझ्या खेळातली नायिका पाळण्यांत रडत ओरडत होती. केंव्हा दरीत अगर नदीत पडेल ह्याचा नेम नव्हता. खलनायकाने नायकाच्या गळ्यावर तलवार रोखली होती. आतां पाळणा थांबवणे म्हणजे अतीशय धोका होता. इकडे घरांतून वहिनींचा आवाज येत होता " भाऊजी, सुरेश रडतो आहे. त्याचे चप्पल द्या हो." नायक पाळण्याच्या कठड्याला कसेबसे धरून खलनायकाला अडवत होता. इतर कोठे लक्ष देणे मला शक्यच नव्हते. वहिनींचा आवाज तेथेच हवेत विरून गेला. सुरेशने आपला आवाज अधिकच चढवल्यावर मात्र आईला ते पाहवले नसावे.

" पिन्या!, देतोस का नाही. का तुझ्यापुढे माझे

डोके फोडून घेऊ?" ती ओरडतच दारांत आली. नायकाला कोंडीत पकडलेला पाळण्याचा कठडा कर्कन मोडला. नायक व नायिका दगडासारखे दरीत कोसळले. आईच्या आवाजाने मला जाग आली. रागारागाने मी तो पाळणा आईच्या दिशेने भिरकावला.

" आज आईला चपलाने मारायला देखील तूं कमी केले नाहीस बाबा!" आईच्या या उद्गाराने मात्र काळजात वीज चमकून गेली. मी काय करून बसलो? आईच्या शब्दांचा मार असह्य होता. आईने हाताने अगर काठीने मारले असते तर बरे झाले असते. " तूं मांग आणी बेरड आहेस असे अण्णा नेहमीं म्हणायचे." असे ती मला नेहमी सुनवायची. मी खराच मांग किंवा बेरड आहे का? आईला चपलाने मारलेल्या मुलास प्रायश्चित हे हवेच. एकहि शब्द न बोलतां मी तेथून पाय काढला व वेड्यासारखा पळत सुटलो. टिळकवाडीच्या कांग्रेस विहिरीपाशी आलो. पोहतां येत नव्हतेच. उडी टाकली असती तर नक्कीच बुडालो असतो. बराच वेळ तेथे बसून राहिलो पण उडी टाकायचे धाडस झाले नाही. दुपारचे बारा झाले. ऊन्हे रणरणत होती. पोटांत कावळे ओरडू लागले पण घरी परतायची इच्छा होत नव्हती. या पापाला शिक्षा ही हवीच. तसाच पाय फरफटत मी बेळगांव धारवाड रेल्वे रुळावरून जाणाऱ्या पुलावर आलो. पुलावरून उडी टाकली असती तर नक्कीच मेलो असतो. तेहि शक्य झाले नाही. शेवटी तेथून खाली उतरून बराच वेळ मी माझ्या नेहमीच्या जागी बसून रेल्वे रुळावरून खाली वर जाणारे इंजिनाने ढकलले डबे पहात बसून राहिलो. व्यर्थ हे ह्या डब्यांचे जिणे. दुसऱ्याने ढकलल्याशिवाय ते कोठे जाऊच शकत नाहीत. कदाचित घर सोडून लष्करात भरती झालो तर घरच्या लोकांना माझे काळे तोंड दाखवावे लागणार नाही. माझे पाय लष्करी तळाकडे वळले. या वयांत मला ते घेतील का? माझी त्यांना काय ओळख सांगायची? तेथे जाऊन फारसे काही उपयोगाचे नाही असे वाटून मी माझे पाय बेळगांवच्या दिशेकडे वळवले. संध्याकाळ झाली होती. बेळगांवला माझ्या आधाराचे एकच स्थान उरले होते. सार्वजनिक वाचनालय. तेथे जाऊन वर्तमानपत्रे व पुस्तके वाचण्याचा निष्फळ प्रयत्न करून पाहिला. कोठेच लक्ष लागत नव्हते. रात्रीचे दहा वाजले. वाचनालय बंद व्हायची वेळ आली. शेवटी नाइलाजाने अपराध्यासारखे अंधारात घरी परतलो.

घरी काळजीने आई वाट पहात होती. माझ्यासारखीच ती पण दिवसभर उपाशीच होती. मी माझ्या जिवाचे बरे वाईट तर करून घेतले नाही ना या विवंचनेत होती. दादा व माझा आते भाऊ संकेश्वराहून आले होते. सर्वजण मी कोठे असेल याचे तर्क कुतर्क करीत बसले होते. मी आल्याचे वहिनींनी जाहीर करतांच दादा संतापाने बाहेर आला. माझी कॉलर पकडूनच त्याने मला आंत आणले व गुरासारखे बडवून काढले. दादाचा राग सहाजिकच होता. त्याला मी दोष देऊ शकत नाही. आईच्या डोळ्यातून घळाघळा अश्रू वहात होते. मुक्यानेच माझ्या डोळ्यातून वाहणारे अश्रू माझे पाप धुऊन काढण्याचा वेडा प्रयत्न करीत होते.

माझ्या जीवनांत अनेक अविस्मरणीय आठवणींचे गाठोडे भरले आहे. पण या प्रसंगाने लागलेली ठेंच मात्र अजून भरून येत नाही.

---

पुणे, जुन १६, २०००
चि. प्रिय अशोक यास,
अनेक आशीर्वाद.
तुझे पत्र व त्याबरोबर चि. बापूकरिता तूं लिहिलेला निबंध मिळाले. माझ्या प्रभावी लेखनशैलीची तूं प्रशंसा केली आहेस. पण ती अप्रस्तुत (unreal) आहे. तुझी नैसर्गिक साधी सोपी भाषा अन्तःकरणाला भिडते. मेंदूला विस्मित करणाऱ्या भाषाप्रयोगापेक्षा हृदयाला स्पर्श करणारे लिहिणे अत्यंत कठीण असते. तुझे निबंधवजा पत्र वाचून घरातील सर्वांचेच मन हेलावून गेले. इतकी वर्षे पाताळात राहून तूं मायभाषा नुसती विसरला नाहीस तर त्यावरील तुझे प्रभुत्व पाहून मन आनंदाने आणि आश्चर्याने भरून गेले. असेच खूप लिही. पत्रव्यवहाराचा हा अचानक उमटलेला झरा मनात वाढत राहू दे. मनातला नन्दादीप जळत राहू दे. श्यामभाई.

---

पुणे, जून २०, २०००
चि. अशोक यास शुभेच्छा,
तुझे पत्र भाईने आणून दिले. ठेच या मायन्याखालील पिताजींच्या, मातोश्रींच्या व काही विलक्षण प्रसंगांच्या आठवणी तूं भरभरून लिहिल्या आहेस. मनोरंजक, किंचित हसवणाऱ्या तसेच डोळ्यांतून टिपे काढण्याइतपत

समर्थ शब्दयोजना करीत वाचकांच्या मनामध्ये हेलकावे निर्माण करण्यात तूं खरोखरच यशस्वी झाला आहेस. क्वचित आनंद, क्वचित वीर व क्वचित कारुण्यरस आदि वाङ्मयात आपल्या सिद्ध सुकृतीनी मराठी वाङ्मयात बहुमोल भर घालून अनेक कवीश्वरांनी ही भाषा समृद्ध केली. व ते प्रथित यश झाले. तूं लिहीत गेलास तर असाच श्रेष्ठ लेखक होऊ शकतोस याची प्रचीति तुझ्या ' ठेच' या निबंधातून येते. ह्या तुझ्या सुप्त गुणांचा अविष्कार मधून मधून काही पत्रांतून किंचितसा आला आहे. मागे एका पत्रात " म्लेंछ गुंतले महीतळ भक्षी । मूषक तैसें प्रसवूनी । बहु जन्मले ।" या काही पिनाकपाणीच्या ओव्या लिहून तूं चांगलीच करमणूक केलीस. आपल्या मर्जीप्रमाणे भाषेला वाकवून तूं लिखाण केलेस व आजपर्यंत इंग्लंड, अमेरिका आदि इंग्लिश प्रभावात, परिसरात, व शेजारी पाजारी इंग्रजी बोलणाऱ्यांच्या सहवासात राहून सुद्धा तुझी मातृभाषा तूं जतन केलीस याचे कौतुक वाटते. चार बुके थोडे इंग्रजी वाचून, " मला आतां मराठी बोलण्याची संवय मोडली आहे हो" असे अहंकाराने फुरफुरणारे येथील ( तथा कथित) प्रतिष्ठित पाहिले की रागाने मन उचंबळते व तुझ्या समर्थ भाषेने भरलेले तूं लिहिलेले पत्र पाहतांच मन आनंदाने भरून येते. झाकली मूठ सव्वालाखाची असे तुझे पत्र वाचून वाटले. ' सुप्त असावे व अवचित विनयाने प्रकट व्हावे' असे त्याचे स्वरूप सर्वांनाच सारखे भावणारे आहे. तुला आतां एकच सांगावेसे वाटते की असेच लिहीत जावे. अश्याच समृद्ध आठवणींचे पुढील काळातील आठवणींचे पत्र पण जरूर यावे. तुझ्या सारखीच श्यामभाईकडे लिहिण्याची कला आहे व त्याचे काही चरित्रपर ( भालजी पेंढारकर, दीनदयाळ उपाध्याय, गाडगे महाराज) असे लेख मासिकांतून प्रसिद्ध झाले आहेत. बाबूरावात हे कौश्यल्य आहे काय? प्रचीति - अनुभव नाही. मला मात्र ' नाही–' हे कबूल करण्यात काहीहि संकोच वाटत नाही. आणखी दुसरी गोष्ट. आठवणी स्मरणात तर रहावयास हव्यात. तर त्या शब्दरूप होतील. ज्या संस्कारात बालपण गेले आणि नंतरचे आयुष्य गेले जात आहे ते पायाभूत संस्कार महत्त्वाचे आहेत. पण घटना घटनातून संस्कार होत राहतात त्याच घटनांची आठवण रहात नाही. आठवतच नाही मग शब्दरूप कसे करणार? मात्र आपली सुधाताई, बाबूराव, अशी एक मैफल व्हावी व त्यात तूही सहभाग द्यावास, आणि मग पूर्वीच्या आठवणी उजळून निघाव्यात हे एक स्वप्न पाहतो आहे. असे काही घडू शकेल का? खरे तर मॅट्रिकपर्यंत गडहिंग्लजात अण्णांच्या सहवासात दिवस घालवीत असतानाचे काही प्रसंग तरी आठवायला हवेत कीं ज्यातून " मातृभिः चिन्त्यमानानाम् ते हि नो दिवसा गताः" असे वाटून हळहळावे. त्यांच्या जवळून बालपणी संस्कृत, इंग्रजी, गणीत शिकण्याचे भाग्य मला लाभले हे माझे सुदैव. व त्याचमुळे मला तुझ्याबाबतीत काही थोडे शालेय अभ्यासात लक्ष देता आले असेल. पण प्रत्यक्ष त्यांच्याकडून धडे मिळणे कोठे आणि माझे अर्धवट पाहणे कोठे. त्यात महदंतर आहे हे मी निश्चितपणे सांगतो.

तुझा, श्रीरंग बापू.

---

स्वतःचीच झालेली स्तुती या दृष्टीकोनातून न पाहता वडिलबंधूंनी लिहिलेला व टीकात्मक अभिप्राय (critical appreciation) कसा लिहावा याचे अनायासे शिक्षण मिळाले या हेतूने याचा समावेश मी येथे करीत आहे.

अशोक——

---

# इंद्राणी

मऊ रेशिमी सॅटिन बिकिनी,
रंग बिरंगी नेसोनी
दौडत खिदळत, लाटा उधळत,
येई राणी इन्द्राणी

सागरतीरी रेतीवरुनी
मुरकत जाई अनवाणी
कमरेभंवती विळखा देउनि
चाले बिलगत मनमानी

अल्लड चंचल केस कपाळी
भुरभुरती तें वाऱ्यानी
चोळिचड्डिचे बंद डोलती
साथ तयांची तालानी

चकमकणाऱ्या किरणांनी
अन् खळखळणाऱ्या लाटांनी
खेळ मांडले लाज सोडुनी
आतुरलेल्या स्पर्शानी

रचनाः- पिनाकपाणि

# मधुमामा. लेखक– पिनाकपाणि

दुपारची वामकुक्षी घेताना आकाशवाणीच्या रेडिओ केंद्रावर लता मंगेशकरचे मधुर स्वर ऐकू यायचे. . . .

" सोडी पदरा, नंदलाला रे ऽ ऽ ऽ
घट डोईवर, घट कमरेवर"
अशावेळी आमच्या मधुमामाला एकदम जाग यायची व त्याचे हात सहजपणे त्याच्या तुळतुळीत डोक्यावरून ठेका देऊ लागायचे. त्याच्या तोंडातून वहाऽवा! असे कौतुकाचे शब्द बाहेर पडायचे. त्याचे आणखीन एक असेच आवडते गाणे होते. महमद रफीचे सूर ऐकू आले रे आले
" हम बेखुदी मे तुम को पुकारे चले गये ऽ ऽ "
कीं, त्याची मांडीवर थाप नक्कीच पडली म्हणून समजावे.

तसे पाहिले तर मधुमामाला मराठी आणि कानडी शिवाय इतर भाषांचे ज्ञान नव्हते. पण शब्दांच्या अर्थापेक्षा सूर, लय आणि ताल यावर त्याचे अतोनात प्रेम दिसून यायचे.

जगामध्ये त्याला माझी आई व मावशी याखेरीज जवळचे असे कोणी नव्हतेच. डोळ्याने आंधळा. त्यामुळे स्वतःच्या उदरनिर्वाहाची काळजी घेणे सुद्धा त्याला जमावे तसे जमत नसे. त्यामुळे आजन्म ब्रह्मचारी राहून जबाबदारीचे कमीतकमी ओझे बाळगण्याखेरीज त्याला गत्यंतर नव्हते. आपल्या कृतीतून मात्र तो नेहमी आपण कोणाचे फुकटचे खात नाही असे दाखवण्याचा अटोकाट प्रयत्न करीत होता. त्याला प्रातःसंध्या, पूजापाठ, नैमित्तिक कर्मे ह्यांचे थोडेफार ज्ञान मिळालेले होते. त्याखेरीज तो तबला चांगला वाजवत असे.
गडहिंग्लजला असताना अण्णानी, म्हणजे माझ्या वडिलानी ताईला, म्हणजे माझ्यापेक्षा सात वर्षानी मोठी असलेल्या माझा बहिणीला संगीत शिकवायला एक गवयी ठेवला होता. तिला तबल्याची साथ नेहमी मधुमामाकडून मिळायची. ताईला प्रेमाने तो आक्कणी म्हणायचा.

" गाऽ ऽयियो गणपती गज वंदन" किंवा
" जागियो यदुनाथ कुंवर पंछी बन बोऽ ऽ ले रे ऽ ऽ"
ताई गाऊ लागायची मामा तबला वाजवायचा. मधून मधून मामाचे वहाऽवा ऐकू यायचे.

" आजवर मी अनेकांना तबल्याची साथ दिली पण आमच्या आक्कणी इतके सूर, लय आणि ताल न सोडता अचूक गाणारे कोणी पाहिले नाहीत". असे तो कौतुकाने सांगायचा. " कोण कसा गातो हे मला बरोब्बर समजते. माझ्या तबल्याचा ठेका चुकला की समजावे. गाणारा येथे चुकतो आहे. आक्कणीबरोबर तबला वाजवताना मला कधीच तबल्याचा ठेका कसरत करून जुळवून घ्यावा लागत नाही". मामा अभिमानाने सांगायचा.
" मी नाटकात, कीर्तनात जमेल तेव्हा साथ दिली. पण मला बऱ्याच जणांनी फसवले. कीर्तनात शेवटची आरती झाल्यावर फिरवलेल्या आरतीतले पैसे तब्बलजीला मिळावयास हवेत. पण हे चोर लेकाचे. कीर्तनकार सगळे पैसे आपणच गिळून बसायचे" मामा आपला राग व्यक्त करीत असे.

" कोठलेही सिनेमातले गाणे घे. ते शास्त्रीय संगीताचा आधार घेतेच. हे गाणे यमन कल्याणवर आधारलेले आहे". मामा माझ्या अज्ञानात थोडी ज्ञानाची भर टाकीत असे.

पहाटे प्रातःसंध्या करून देव पूजा करणे, खेडेगावी शेतकऱ्यांची लग्ने लावणे ही कामे सुद्धा त्यानी बऱ्याच वेळा केली असल्याचे त्याच्याबरोबर गप्पा मारताना मी ऐकले होते. हातात काठी घेऊन चाचपडत व आपले न दिसणारे डोळे जमिनीकडे टक लाऊन तो चहुकडे शोधत असे व शेवटी एका जागी काठीने टिचक्यामारीत सांगत असे, " येथे खणा. तीस ते पस्तीसफुटावर नक्की पाणी लागेल". विश्वासू शेतकरी पाणी लागले तर आनंदाने सांगत यायचे, " मधुअण्णा, पानी लागलं की वो तुम्ही सांगितल्यावाणी!"

अंगाने कृशच पण सरळ तरतरीत नाक, सावळा रंग, साधारणपणे पाच फूट चार ते पाच इंच उंची, तुळतुळीत डोके, त्यावर छोटीशी शेंडी, दाभणकाठी मिश्या, तुळतुळीत अंग, छातीवर मोजकेच केस, अशी ही मामाची मूर्ती घरात असली की, नेहमी उघड्या अंगाची, गळ्यात जानवे व कमरेखाली नुसता एक पंचा नेसलेली असायची. विहिरीचे पाणी ओढत असला म्हणजे त्याच्या दंडातील बेडक्या टपोरून आलेल्या दिसायच्या. प्रत्यक्ष मी कधी पाहिले नाही पण त्यावरून तो नियमित थोडा

फार व्यायाम करीत असावा. रिकाम्या वेळी चंची मधून पान, चुना, तंबाकू बाहेर काढून त्याची गोळी करून तास न् तास चघळत बसत असे. मला वाटते, अधुनमधुन बिड्या ओढायची पण त्याला संवय होती. घराबाहेर पडताना मात्र तो डोक्यावर पगडीसारखा गुंडाळलेला रुमाल, कॉलर नसलेला शर्ट, त्यावर कोट, कमरेखाली धोतर, पायी कापशीच्या चपला, खांद्यावर शेला आणि सामान भरलेली हबशी टाकून काठीने चाचपडत जात असे. कित्येकवेळा माझ्या मनात येत असे, मामाला शर्ट, कोट, पॅन्ट, बूट, हॅट चढवून डोळ्यावर काळा चष्मा घातला तर रुबाबदार साहेबासारखा दिसेल.

" कोण बाबा त्याला गरीबाला घेऊन देणार? तूं मिळवता झालास म्हणजे घेऊन दे." आई कींव येऊन म्हणायची.

टिळकवाडीतील बुरलींच्या घरातील आमच्या जागेत आई सर्व कामे आटोपून माजघरात दुपारी जरा लवंडलेली असायची. " कृष्णाबाई, लोंढा पॅसिंजर गेली बघ. चार वाजले. जरा चहा करतेस." आगगाडीची शिट्टी व आवाज ऐकून मांडीवर हात रगडत बसलेला मामा सुचवत असे. " पुरं झालं बाबा तुझं! आत्ता कुठं जरा डोळा लागला होता. " म्हणत का होईना पण आई उठायची व चहाच्या मार्गाला लागायची.
आगगाडीचा आवाज, खेडेगावी घरावरून जाणाऱ्या विमानाची घरघर, एस् टी बसचे आगमन वगैरे आवाजावर मामाचे घड्याळ चालत असे. कोणालाहि आश्चर्य वाटेल पण पिठलं भात, आमटी आणि बटाट्याची भाजी कशी करावयाची हे मी मधुमामाकडून शिकलो. त्यावेळी आई एक दोन दिवसासाठी खेडेगावी गेली होती. घरी फक्त मी, बापू व मधुमामा होतो. आईला मामाने " तूं कांही काळजी करू नकोस, आम्ही पाहून घेतो" म्हणून सांगितले होते. फोडणी कशी द्यायची, तिखट, मीठ किती घालावयाचे वगैरे मामाने व्यवस्थित सांगून माझ्याकडून सोपासा स्वयंपाक करून घेतला होता. हे ज्ञान बहुतेक त्याने आईकडूनच शिकले असावे. आंधळ्याला स्वावलंबीपणाचे दूध पाजवण्याएवढी ती दूरदर्शी नक्कीच होती.

अण्णांच्या कडून मामाला संस्कृत सुभाषितांचे ज्ञान मिळाले होते. अण्णा त्याला प्रेमाने ' मेरा अगर मध्वमुनी' म्हणत असत. तेंच नांव दादाने पुढे चालू ठेवले.

" अतिपरिचात् अवज्ञा। संतत गमनात् अनादरो भवति। मलये भिल्ल पुरंध्री चंदनतरुकाष्ठमिधनम् कुरुते॥"

" फार दिवस एके ठिकाणी राहण्यात अर्थ नाही रे बाबा! थोडक्यातच गोडी असते."

मामाला स्वतःचे घर असे नव्हते. त्यामुळे कधी आईजवळ, कधी मावशीजवळ, कधी विठूकाकांजवळ, कधी गणपूकाकांजवळ, कधी दादा तर कधी माझ्या मावस भावंडांबरोबर असे थोडे थोडे दिवस राहून मामाचे जीवन चालले होते. जमेल तेवढे घरकाम करून, देवपूजा करून आपले फार ओझे वाटणार नाही एवढ्यातच तो आपला मुक्काम दुसरीकडे हालवीत असे.

मामाचे दिशा ज्ञान हे एक गूढच आहे. एका गावाहून दुसरीकडे मामा एकटाच खूप फिरायचा. चुकून दुसऱ्याच बसमध्ये शिरला व वाट चुकला असे कधी झाले नाही. तिकिटाचे पैसे देणे व मोड बरोबर परत घेणे ह्यात तो कधी चुकला नाही. दर वर्षी तो मणगुत्तीला जायचा व आपल्या दीड दोन एकर जमिनीच्या उत्पन्नाची वसुली तो न चुकता बरोबर करून परत यायचा. आंधळा माणूस म्हणून शेतकऱ्यानी त्याचा फायदा घेतल्याचे ऐकीवात नाही. वसूली करून परत येत असताना मात्र एकदा त्याला एस् टी बसमध्ये कोणीतरी सर्व लुटले होते. नुसत्या अंगावरील कपड्यानिशी आणि उपाशी " कृष्णाबाई माझे सर्व गेले ग बाई" म्हणत घरी आला. त्याच्या चंची, हबशी पासून सर्व कपड्यांची सर्व व्यवस्था आईने व शहापूरच्या माझ्या मावस बहिणीने केली.

चंद्रग्रहण, सूर्यग्रहण असले की तो आपल्या श्रद्धेनुसार उपवास, स्नान व पूजा अगदी कडकपणे करायचा. " दे दान सुटे गिराण" ह्या भिक्षुकांच्या आवाजाचे घड्याळ वापरून आपली कर्मे उरकायचा. एकदा शुचिर्भूत झाल्यावर त्याची पूजा संपेपर्यन्त त्याला कोणी हात लावावयाचा नाही. न पेक्षा तो पुन्हा विहिरीवर जाऊन गार पाण्याने अंघोळ करून यायचा. थंडीत थरथर कापत व हुडहुडत त्याचे पूजामंत्र चालायचे. पहाटे लौकर उठून शौचाला जावे व नंतर स्नान, पूजा झाल्यावर मुख्यतः जेवण झाल्यावर लागलीच शौचास जाऊ नये असे त्याचे ठाम मत होते. ते तो कटाक्षाने पाळत असे. " मामा, खाल्लेले अन्न काही लागलीच शौचद्वारे बाहेर जात नाही. अन्न पचन व्हायला कमीत कमी आठ

ते बारा तास लागतात" हे माझे म्हणणे त्याला फारसे आवडत नसे पण त्यावर तो कधी फार वाद घालत नसे.

श्यामभाईचे लग्न झाल्यावर सौ. ललितवहिनींना संगीताची आवड आहे व त्याना शास्त्रीय संगीत येते हे ऐकून मामाला आनंद झाला. त्यांनाहि मामाने तबल्याची साथ दिली होती. एकदा संसारात पडल्यावर मात्र वहिनींनी आणि ताईनी आपले संगीतावरील लक्ष सोडून दिले व मामाला परत तबल्याची साथ द्यायची संधी मिळाली नाही.

टिळकवाडीतील सावनूरमामांना त्यानेच " तुमची नात विमल, माझ्या भाच्याला द्या" म्हणून प्रस्ताव मांडला व बापूचे लग्न शहापूरच्या महादेवाच्या मन्दिरात मोठ्या थाटाने विभावहिनींबरोबर झाले. त्यावेळी खाल्लेले मांडे मला आठवले की अजून तोंडाला पाणी सुटते.

बापूने बुरलींच्या भाड्याच्या जागेला एकदां नवा रंग लावून सजवले होते तेव्हा " विमले, कारभारणीला खूष करायला कसा झोकात रंग लावून घर सजवले आहे बघ!" असे दोन तीन वेळा मामाने म्हणून दाखवले होते. मला खात्री आहे. विभावहिनींना ते नक्कीच आठवेल.

मधुमामा दादाकडे असला की सुरेश, शैला, शोभा या आपल्या नातवंडांना मांडीवर बसवून घेऊन तो त्यांना बिरबल, बादशहा, आणि शार्दुल वाघ सिंहाच्या गोष्टी मोठ्या रंगात येऊन सांगत असे. मुले पण त्यात खूप रंगून जात असत. मधुमामाला दिसत नसल्यामुळे लिहिता वाचता येत नसले तरी श्रवण, स्मरण आणि स्वैर विचार शक्तीच्या जोरावर गोष्टी स्वतःच नव्याने रचून कल्पनेच्या विश्वात मुलांना कोठच्या कोठे नेऊन आणत असे. " मधुआज्जा गोष्ट सांगा" म्हणून ती सारखे त्यांच्या मागे लागत असत. मधुमामापण कधीहि कंटाळा न करता नव्या उत्साहाने त्यांना नव्या आणि मुलांनीच काय पण मीहि कधी न ऐकलेल्या गोष्टी ऐकवत असे.

मी पुण्याला एस् पी कॉलेजमध्ये शिकत असताना एकदा सुटी लागली म्हणून दादाकडे आलो होतो. मधुमामापण तेथे होता. कोजागिरी पोर्णिमा होती. रात्री समोरच्या वडाच्या झाडावर बरेच कावळे जमले होते. सर्वांनी एकदम काव काव सुरू केल्यावर मामा म्हणाला, " काय कटकट सुरू केली आहे ह्या कावळ्यानी" त्यावर मी म्हटले,

कोजागिरी करी साजरी काकमेळा वडावरी
शाळा भरुनी विचार मांडिती पुनवेच्या ते कोऱ्यावरी

मी क्षणात मांडलेले काव्य ऐकून मामा खूष झाला. " अशाच कविता करीत राहिलास तर तूं एक मोठा कवि होशील. तुझा गणपूकाका पण अशाच मजेशीर कविता करायचा." मामाचे त्यावेळचे शब्द मला अजून चांगले आठवतात.

माझे इंजिनियरिंगचे शिक्षण सुरू झाल्यापासून मात्र माझा व मधुमामाचा संपर्क कमी झाला. तो कुठे असतो व कसे काय चालले आहे ते कळयला मार्ग नव्हता. १९६२ साली मी बडोद्याला इंजिनियरिंगच्या दुसऱ्या वर्षाला होतो. त्यावेळी श्यामभाईपण तेथेच असल्यामुळे घरीच केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या वसाहतीत आम्ही रहात होतो. सकाळचा इलेक्ट्रिकल इंजिनियरिंगच्या वर्कशॉपमध्ये प्रयोग संपवून मी नुकताच घरी दुपारच्या जेवणासाठी परत आलो होतो. नेहमीप्रमाणे माझे जेवण झाले. ती. सौ. ललितवहिनी जरा मुग्धच होत्या. जेवण संपेपर्यन्त त्या कांही बोलल्या नाहीत. जेवण झाल्यावर मी बाहेरच्या खोलीत आलो. वहिनी पण माझ्या मागून तेथे आल्या. " दादाकाकांचे पत्र आले आहे" एवढेच त्या म्हणाल्या व त्यांनी माझ्या हातात दादाचे आलेले एक पत्र वाचायला दिले. मी पत्रावरून नजर फिरवली. ' कळवण्यास अतीशय वाईट वाटते की मधुमामास देवाज्ञा झाली. आतां मेरा म्हणून हांक मारायला कोणी राहिले नाही' क्षणभर डोळे पाणावले. फारसे रडू आले नाही पण त्याला शांती मिळावी या हेतूने मी नेहमी घरी आल्यावर जी रेडिओवर सिनेमातली गाणी ऐकत होतो ते चार दिवस तरी बंद ठेवायचे ठरवले. वहिनींना वाईट वाटत असल्याचे त्यांच्या चेहऱ्यावरून दिसत होतेच. काही झाले तरी त्या व मधुमामा दोघेहि संगीतप्रेमी होते. काही काळ का होईना त्यांना पेटीवर मधुमामाच्या तबला डग्याची साथ मिळालेली होती. घरात दोन दिवस गंभीर कळा आली होती. तिसऱ्या दिवशी मात्र मला राहवले नाही. मधुमामाला काय आवडले असते ते ध्यानात आले. मधुमामाचे आवडते महमद रफीने गायलेले गाणे रेडिओवर लागले तर किती बरे होईल असा विचार मनात आला.

हम बेखुदी मे तुम को पुकारे चले गये।
सागर मे जिंदगी को उतारे चले गये।
रेडिओ लावला. पण सत्य जीवन हे थोडेच सिनेमातल्या गोष्टीप्रमाणे असते. सहजा सहजी त्याचे आवडते गाणे एकदम लागण्यासारखे नव्हते.
चार महिने निघून गेले. माझी वार्षिक परीक्षा झाली. चि. सुधीर, रेखा व राजीव ह्यानापण उन्हाळ्याची सुटी लागली. बडोद्याचा उन्हाळा फार तीव्र. मुलांना सोसायचा नाही म्हणून आम्ही सुटीकरता पुण्यास आलो. देशमुखवाडीत ताईच्या घरी मुक्कामाला पोहोचलो. घरात आई, ताई, व सुनन्दावहिनी होत्या. आईला पाहताच मात्र ललितवहिनींना राहवले नाही व त्यानी आईजवळ बसून अश्रूंना वाट दिली. आपल्याला पेटीवर साथ देणारे मधुमामा आता राहिले नाहीत हे त्यांचे दुःख इतरांना सहजासहजी समजण्यासारखे नव्हते. त्यासाठी संगिताचा जिव्हाळा संबंध असावा लागतो.

त्यावेळी आईने सांगितलेली मधुमामाची आठवण मात्र जिवाला चटका लावून जाणारी होती. बिचाऱ्याला शेवटचे क्षण मात्र सुखाचे गेले नाहीत.
नेहमीप्रमाणे त्याने आपला मुक्काम हलवायचे ठरवले होते. त्याने आपली हबशी बांधली व गडहिंग्लजला विठूकाकांकडे जाऊन चार दिवस रहावयाचे ठरवले होते. अनाहुत पाहुण्याप्रमाणे तो तेथे गेला खरा. गेल्याबद्दल फारसे कांही बिघडले नसते. पण तेथे जाऊन त्याने अंथरूण धरले. फणफणून ताप भरला. पद्माकाकू घाबरून गेली. तो इथे कशाला आला असे तिला वाटणे सहजिकच होते.

माणूस धडधाकट असताना आला तर फारसे काही बिघडत नाही. पण न सांगता आलेल्या पाहुण्याचे आजारपण काढणे कोणाला आवडेल? तिने लागलीच आईला व मावशीला बोलावून घेतले. " आत्ताच्या आत्ता ह्याला येथून हालवा. आपल्या हातात त्याचे आजारपण काढण्याचे बळ नाही" असा राग व्यक्त केला.

" पद्माबाई शांत हो. हलवण्यासारखी परिस्थिती असती तर अवश्य हलवले असते. इथे याने यावयाला नको होते खरे. आला आहे खरा. आता त्रागा करून काय उपयोग?" आई व मावशीने जितकी समजुत काढणे शक्य होते तितकी काढून पाहिली. इकडे मामाच्या दोन्ही हाताची बोटे मस्तकावर मृदुंग वाजवत होती. जसा ताप चढेल तसा त्यांचा वेग वाढतच होता. जणुं अंगातला ताप, भरलेली हुडहुडी आणि हाताची बोटे ह्यांची जुगुलबंदीच चालली होती. माझ्या कलेला पुरता वाव मिळाला नाही. शेवटी तरी मला भरपूर तबला वाजवू दे असा त्याचा चेहरा सांगत होता.
हम बेखुदी मे तुम को पुकारे चले गये।
सागर मे जिंदगी को उतारे चले गये।
मोठ्या ईर्षेने मस्तकावर त्याची बोटे मृदंग वाजवत होती. त्यातच त्याने आपला श्वास केव्हा सोडला कोणाला समजले देखील नाही. बहिणी बहिणींने आपल्या भावाच्या चितेला अग्नी दिला. चितेच्या ज्वाला थैमान करीत सुरात आणि तालात नाचत होत्या- - -
हम बेखुदी मे तुम को पुकारे चले गये।
सागर मे जिंदगी को उतारे चले गये।

---

# बोका

कवि- पिनाकपाणि

उघडतां दार मी समोर धावे नाका
मज आणुन द्या तो दादा वहिनींचा बोका ।धृ।

ती आई पळाली पणतू बघण्यासाठी
सोपवून घर हे सारे माझ्या गांठी
हा बोका उरला मजला सेवेसाठी
तो गमावला तर काय कथूं मी लोका ?
मज आणुन द्या तो दादा वहिनींचा बोका .. .. .. ।१।

धावले पकडण्या त्याला परसू दारी
बघतांना दमले शोधुन झुडुपे सारी
मुरगळून पाय मी झाले अबला नारी
दार झाकतां बोट चिमटुनी हाती आला पोका
मज आणुन द्या तो दादा वहिनींचा बोका .. .. .. ।२।

ओकतो हागतो मुततो कितिदां बाई
हा उडी टाकुनी चिमण्या पक्षी खाई
अडवण्यास जातां झटकन पळुनी जाई
धाप लागुनी हृदयाचा ह्या चुकतो माझा ठोका
मज आणुन द्या तो दादा वहिनींचा बोका .. .. .. ।३।

माहेरी येउन सासुरवाशिण झाले
तुमचे ना माझे कवतुक त्याचे चाले
हा सागर तरुनी कशास येथे आले ?
अंत पाहतो छळण्यासाठी श्वशुर माझा तो का ?
मज आणुन द्या तो दादा वहिनींचा बोका .. .. .. ।४।